# मिरा भाईंदर महानगरपालिका

## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION


कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www. mbmc.gov.in

मुख्य कार्यालय


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. मिभा / मनपा /अ.आ/११२/२०२४-२५ दिनांक: २०/०८/२०२४

प्रति,

**माननीय अध्यक्ष / माननीय महासचिव,**

**जंजिरे किल्ला जतन समिती**

श्री निवास, मनपा शाळे समोर,

मुर्धा गांव, उत्तन रोड, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे - 401101

**विषय :-** घोडबंदर किल्ला येथे सुरक्षा रक्षक नेमणे तसेच सी.सी.टीव्ही कॅमेरा बसविणे परिसराची स्वच्छता ठेवणे इत्यादी कामाबाबत..

**महोदय,**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे.घोडबंदर येथील राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचलानालय विभागाच्या ताब्यातील किल्ला "महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक संगोपन" योजनेतंर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस संगोपनार्थ दत्तक देण्यात आलेला आहे. सदर किल्ल्याचे संवर्धन, संरक्षण, सुशोभिकरण, जतन व दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

सदर ठिकाणी किल्ल्याचा परिसर सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक नेमणे तसेच सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविणे बाबतचा निर्णय घेण्यात आला असून तात्काळ तीन पाळीमध्ये प्रत्येकी दोन सुरक्षा रक्षक नेमण्यात येत आहेत. तसेच किल्ला व किल्ला परिसर स्वच्छ ठेवण्यात येऊन सी.सी.टीव्ही कॅमेरा बसविणेची प्रक्रिया तातडीने करण्यात येईल. तरी आपले आंदोलन व साखळी उपोषण मागे घेऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**(डॉ. संभाजी पानपट्टे)**

**अतिरिक्त आयुक्त (2)**

मिरा-भाईंदर महानगरपालिका

**माननीय आयुक्त सो यांच्या मान्यतेने**

**प्रत :-**

**मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक**

**भाईंदर पोलिस ठाणे**

**मिरा-भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तालय**

मिरा-भाईंदर महानगरपालिका जुने कार्यालया शेजारी,

स्टेशन रोड, भाईंदर (प.)

PC-09/VP/2024-25/DK/L-44

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // प्रेस नोट //

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर येथील राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचलानालय विभागाच्या ताब्यातील ऐतिहासिक किल्ला "महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक संगोपन" योजनेतंर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस संगोपनार्थ दत्तक देण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी किल्ला परिसर सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक नेमणे, सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविणे व किल्ला परिसरात मद्यपीचा वावर बंद करणे इत्यादी मागणीसाठी जंजिरे किल्ला जतन समितीमार्फत आंदोलन व साखळी उपोषण सुरु करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिमकेमार्फत सर्व मागण्या मान्य करुन तातडीने तीन पाळीमध्ये प्रत्येकी दोन सुरक्षा रक्षक नेमण्यात आले आहेत. तसेच किल्ला व किल्ला परिसर नियमित स्वच्छ ठेवण्यात येणार असून सी.सी.टीव्ही कॅमेरा बसविण्याची प्रक्रिया तातडीने करण्यात येणार आहे. आंदोलन व साखळी उपोषण मागे घेऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे असे नमुद करुन अध्यक्ष/महासचिव, जंजिरे किल्ला जतन समिती यांना आंदोलनाच्या ठिकाणी महानगरपालिकेमार्फत पत्र देण्यासाठी गेले असता सदरचे पत्र घेण्यास समितीने नकार दिला आहे. महानगरपालिकेमार्फत मागण्या मान्य होऊन देखिल सदर साखळी उपोषण मागे घेतले नाही.